Phone N0.91-7232-242456
Phone No.91-9421166335

महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता

Email : dean_vngmc@rediffmail.com
Website : www.vngmcytl.ac.in

श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ
SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL –445001

दिनांक :–23/07/2025

जा.क्र.शावैमय/स्टे/10396/2025

**अंतर्गत तक्रार समिती**

विषयः– कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम 2013 ची अंमलबजावणी करणेकरीता अंतर्गत तक्रार समितीची स्थापना करणेबाबत.

संदर्भः– 1. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र जा.क्र.संवैशिवसं/समन्वय/महिला तक्रार निवारण समिती/4388/2025 दि. 23.07.2025
2. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शावैमय/स्टे/7596–97/2024 दि. 12.07.2024

उपरोक्त संदर्भिय क्र. 01 अन्वये कामाच्या कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम 2013 कलम 4 अन्वये प्रत्येक कार्यालयामध्ये 10 किंवा 10 पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असतील अशा सर्व शासकीय निमशासकीय आणि खाजगी आस्थापनामध्ये तक्रार समिती स्थापन करणेबाबत कळविले आहे.

सदर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

1. आपल्या कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात यावी.
2. आपल्या विभागात संस्थास्तरीय नोडल ऑफिसर नेमण्यात यावा
3. तक्रार समिती स्थापन केल्यानंतर तक्रार समितीची अदयावत माहिती ONLINE SHE BOX PORTAL (shebox.wcd-gov.in) वर भरणे (UPLOAD) करावी.

त्याअनुषंगाने, या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय, स्त्री रूग्णालय व अति., रूग्णालय या सर्व आस्थापनेकरीता कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगिक छळापासून संरक्षण प्रदान करण्यासाठी आणि लैंगिक छळास प्रतिबंध करून त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी The Sexual Harassment of Women at Workplace (Prevention, Prohibation and Redressal ) Act, 2013 हा कायदा प्रस्थापीत करण्यात आला असून सदर कायद्यानुसार या संस्थेकरिता खालीलप्रमाणे **"अंतर्गत तक्रार समिती (Internal Complaints Committee)"** संदर्भ क्र. 02 अन्वये या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये कार्यरत होती. सदर समितीमध्ये बदल करून समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

1. डॉ. क्षमा केदार, प्राध्यापक व विभागप्रमुख स्त्रीरोगशास्त्र–**पिठासन अधिकारी (Presiding Officer)**
2. डॉ. बी.एस.येलके, प्राध्यापक व विभागप्रमुख, औषधवैद्यकशास्त्र –सदस्य
3. डॉ. अरूणा पवार, सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, क्षकिरणशास्त्र –सदस्य
4. डॉ. संतोष भोसले, सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र –सदस्य
5. डॉ. अर्चना कन्नमवार, सहयोगी प्राध्यापक, शरिररचनाशास्त्र –सदस्य
6. डॉ. सुधा राठी (वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्या) –सदस्य
7. डॉ. सुरेंद्र भुयार, वैद्यकीय अधिक्षक, रूग्णालय –सदस्य
8. श्री. संतोष झिंजे, प्रशासकीय अधिकारी –सदस्य
9. श्रीमती माया मोरे अधिसेविका, रूग्णालय –सदस्य
10. श्रीमती सरीता कुडमेथे, कार्यालयीन अधिक्षक, अतिविशेषोपचार रूग्णालय –सदस्य

committee

सदर समितीने महाविद्यालयात/संस्थेत महिला कर्मचारी अथवा विद्यार्थीनीवर लैंगिक छळ/अत्याचार झाल्याची घटना घडल्यास तात्काळ सदर प्रकरणी सखोल चौकशी करून अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह अधिष्ठाता कार्यालयास गोपनीयरित्या सादर करावा. तसेच तक्रारकर्त्या महिला कर्मचा–यांचे /विद्यार्थीनीचे नाव गोपनीय राहील व त्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबत विशेष खबरदारी घ्यावी.

तक्रार समितीची अदयावत माहिती ONLINE SHE BOX PORTAL (shebox.wcd.gov.in) वर भरणेकरीता डॉ. अर्चना कन्नमवार, सहयोगी प्राध्यापक, शरीररचनाशास्त्र यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

डॉ. क्षमा केदार, प्राध्यापक व विभागप्रमुख यांची पिठासन अधिकारी **(Presiding Officer)** म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी सदर समितीचा कार्यभार स्विकारून तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. गिरीश ल. जतकर),
अधिष्ठाता,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
यवतमाळ.

प्रति,

वरीलप्रमाणे पिठासन अधिकारी, नोडल अधिकारी व सर्व सदस्य , श्री.व.ना.शा.वै.महाविद्यालय व रूग्णालय, यवतमाळ.

प्रतिलीपी – मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.